# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## सिडकोच्या प्रस्तावित धरणांमध्ये पनवेल महानगरपालिकेला पाणीपुरवठा करण्यासाठी पूर्ण क्षमतेचा स्वतंत्र जलस्त्रोत निर्माण करण्याबाबत

**(१) १८ (१७-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोच्या प्रस्तावित धरणांमध्ये पनवेल महानगरपालिकेचा पाणीपुरवठा करण्यासाठी पूर्ण क्षमतेचा स्वतंत्र जलस्त्रोत उपलब्ध नसून भविष्यातील नियोजनांतर्गत कुंडलिका नदीवरील डोलवाल बंधाऱ्यातून घरगुती वापराकरिता ५१७.३५ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी आरक्षणाचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांच्या कार्यालयामार्फत कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास मंडळ, ठाणे यांच्या कार्यालयास दिनांक २१ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत २८१ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाण्याची आवश्यकता असून केवळ २१२ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत आहे व ६९ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी अपुरे पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल महानगरपालिकेकरिता पाणी आरक्षण मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री (कोकण विभाग) यांना निवेदनाद्वारे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पनवेल महानगरपालिकेकरीता पाणी आरक्षण मंजूर करण्यासंदर्भात कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास मंडळ, ठाणे यांनी केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, पनवेलमधील अंतर्गत पाणी टंचाई कमी होण्याबाबतच्या उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१३-०८-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांच्या दिनांक ३१/०७/२०२४ रोजीच्या प्रस्तावानुसार पनवेल महानगरपालिकेस सन २०५१ च्या लोकसंख्येच्या आधारावर ५१७.६५ द.ल.लि.पाणी आवश्यकता नमूद केली आहे. सद्य:स्थितीत पनवेल महानगरपालिकेला विविध स्त्रोतामधून

२३४ दललि/दिन इतका पाणीपुरवठा होत आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागातंर्गत मुंबई महानगर प्रदेशातील विविध प्रकल्पांबाबत दिनांक २७/०१/२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत डोलवहाल बंधाऱ्यातून केलेली पाणी आरक्षण मागणी ऐवजी नियोजित पोशीर व शिलार धरणातून पनवेल महानगरपालिकेस पाणी देण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत.
(५) दिनांक ३०/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार शिलार पाणीपुरवठा प्रकल्पास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रकल्पाचे काम सुरु करणेस्तव भूसंपादन, वनजीवन संपादन व निविदाबाबत कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतिपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांबाबत

**(२) १९ (१७-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणारे नैना, मेट्रो, विमानतळ, कॉर्पोरेट पार्क, गृहनिर्माण आदी महत्वाकांक्षी प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे आव्हान सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांच्यासमोर असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडको महामंडळावर रुपये ११३० कोटींचे कर्ज असल्यामुळे सिडकोची आर्थिक संकटात असल्याने या महत्वाकांक्षी प्रकल्पांना गती देऊन ते पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

तथापि, नवी मुंबई मध्ये सिडको महामंडळाने नैना, मेट्रो, विमानतळ, कॉर्पोरेट पार्क, गृहनिर्माण आदी महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. त्यापैकी नवी मुंबई मेट्रो मार्ग १ हा प्रकल्प पूर्ण होऊन कार्यान्वित झालेला आहे आणि सिडकोने आक्टोबर, २०२४ मध्ये २५,७२३ घरांची नविन गृहनिर्माण योजना जाहीर केली असून त्याच्या सोडतीमध्ये १९,५१८ घरांसाठी विजेते अर्जदार घोषीत करण्यात आले आहेत. त्यापैकी जे विजेते अर्जदार घरांच्या संपूर्ण रक्कमेचा भरणा सिडकोकडे करतील त्यांच्यासोबत करारनामा करून त्यांना घराचा ताबा देण्यात येईल. उर्वरित प्रकलपांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) सिडको महामंडळावर सुमारे रुपये ११३० कोटीचे कर्ज आहे, हे खरे आहे. परंतु त्यामुळे सिडकोची आर्थिक परिस्थिती कमकुवत नाही. नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प सरकारी / खाजगी तत्त्वावर उभारण्यात येत असून विकासकामार्फत प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्यात येत आहे. सिडकोमार्फत हाती घेतलेल्या विविध विकास कामांसाठी सिडकोकडे उपलब्ध अतिरिक्त जमिनीची विक्री करून निधी उभा केला जात आहे. त्यासोबतच प्रधान मंत्री आवास योजनेतील घरांची विक्री करून निधी उभारला जात आहे. सदर उभारलेल्या निधीमधून विविध पायाभूत सोयी सुविधा निर्मिती हाती घेण्यात येत आहेत.

त्यापैकी नवी मुंबई मेट्रो मार्ग-१ हा प्रकल्प पूर्ण होऊन कार्यान्वित झालेला आहे. सिडकोने माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये २५,७२३ घरांची नविन गृहनिर्माण योजना जाहीर केली असून त्याच्या सोडतीमध्ये १९,५१८ घरांसाठी विजेते अर्जदार घोषीत करण्यात आले आहेत. त्यापैकी जे विजेते अर्जदार घरांच्या संपूर्ण रक्कमेचा भरणा सिडकोकडे करतील त्यांच्यासोबत करारनामा करून त्यांना घराचा ताबा देण्यात येईल. उर्वरित पायाभूत सुविधा निर्मिती प्रकल्पांची कामे प्रगती पथावर आहेत. नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प सरकारी / खाजगी तत्वावर उभारण्यात येत असून विकासकामार्फत प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत एप्रिल २०२५ पर्यंत प्रकल्पाने ९३.२१% भौतिक प्रगती केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सिंचन क्षेत्राची आकडेवारी प्रसिध्द करण्याबाबत

**(३) ७१९ (१७-०४-२०२५) श्री.हेमंत पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालात वेगवेगळ्या क्षेत्रांची माहिती आकडेवारीसह प्रसिध्द केली जात असताना गत १४ वर्षापासून राज्याच्या सिंचन क्षेत्राची आकडेवारी उपलब्ध नाही या एकाच शेऱ्याखाली जाहीर केल्याचे दिसून येत असल्यामुळे विभागनिहाय सिंचन अनुशेष आणि राज्याची संभाव्य वाटचाल निश्चित करण्यात तांत्रिक समस्या उद्‌भवत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सिंचन क्षेत्राची माहिती प्रसिध्द न करण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, सिंचन आकडेवारी प्रसिध्द न केल्यामुळे कोटयवधींच्या निधीतून उभारलेल्या सिंचन प्रकल्पांनी प्रत्यक्षात किती क्षेत्र सिंचित झाले, याची माहिती मिळत नसून सदरची आकडेवारी निश्चित करण्यासाठी जलसंपदा विभागाने अभ्यास गट नियुक्त केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा दरम्यान निदर्शनास आली असून सदर अभ्यास गटाकडून तालुका निहाय किती जिल्हयांचा अभ्यास करण्यात आला तसेच उक्त अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ८६ मोठे, २९८ मध्यम आणि ३३१३ लघु (उपसा सिंचंन प्रकल्पासह) प्रकल्प असून प्रकल्पानुसार सिंचन क्षमता निर्माण होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने प्रत्येक जिल्ह्याच्या सिंचन क्षमतेनुसार जल सिंचन प्रकल्प उभारण्याबाबत तसेच राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील तालुकानिहाय सिंचन क्षेत्राची माहिती राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०८-२०२५) :** (१) व (२) १.महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवालात जलसंपदा विभागांतर्गत पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता व मोठे, मध्यम व लघु प्रकल्पाखालील कालवा व नदीद्वारे सिंचित क्षेत्र तसेच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील विहिरींव्दारे सिंचन क्षेत्राची माहिती दरवर्षी उपलब्ध करुन देण्यात आली असून दरवर्षीच्या प्रकाशनात समाविष्ट करण्यात

आली आहे.
२.जलसंपदा विभागाच्या अधिनस्त प्रकल्पांची महामंडळनिहाय/हंगामनिहाय सिंचित क्षेत्राची माहिती सिंचन स्थितीदर्शक अहवाल या अहवालात दरवर्षी प्रसिध्द करण्यात येते. सदर सिंचन स्थितीदर्शक अहवाल जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
३.राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र याबाबतची माहिती जलसंपदा विभागाचा शासननिर्णय दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ अन्वये विहीत केलेल्या पध्दतीनुसार कृषी आयुक्त कार्यालयाने तयार करणे अपेक्षित आहे. शासन निर्णयानुसार गावपातळी, तालुकापातळी व जिल्हापातळी याप्रमाणे विहीत प्रपत्रात माहितीचे संकलन अपेक्षित आहे. सदर माहिती संबंधितांकडे प्रदीर्घ पाठपुरावा करूनही अप्राप्त असल्याने या प्रपत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी जलसंपदा विभागाने अभ्यासगटाच्या रचनेचा शासन निर्णय दिनांक २३/१२/२०२४ अन्वये निर्गमित केला आहे. अभ्यासगटाची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.
(३) हे खरे नाही,

राज्यात ८६ मोठे, २९८ मध्यम आणि ३३१३ लघु (उपसा सिंचन प्रकल्पासह) प्रकल्प असून सिंचन स्थितीदर्शक अहवालात दर्शविल्यानुसार प्रकल्पप्रकारानुसार ३०जून २०२२ अखेर मोठे व मध्यम प्रकल्पाची एकत्रित निर्मित सिंचन क्षमता ३८.६९ लक्ष हे. व लघु प्रकल्पांची निर्मित सिंचन क्षमता १६.९२ लक्ष हे. आहे.
(४) दिनांक २३/१२/२०२४ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली असून अभ्यासगटाची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## जायकवाडी (जि.छत्रपती संभाजीनगर) व मांजरा (जि.बीड) या दोन्ही प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी असलेल्या कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) ७६५ (१७-०४-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी (जि.छत्रपती संभाजीनगर) व मांजरा (जि.बीड) या दोन्ही प्रकल्पांच्या व्यवस्थापनासाठी असलेल्या कार्यालयात कार्यकारी अभियंत्यासारखी इतर अनेक महत्वाची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन्ही प्रकल्पासाठी माहे डिसेंबर, २०२४ अखेर प्रकल्पनिहाय एकूण मंजूर पदे किती व रिक्त पदे किती आहेत तसेच सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०८-२०२५) :** (१) हे, खरे नाही.

जायकवाडी प्रकल्पाकरीता दोन विभाग आहेत व मांजरा प्रकल्पाकरीता एक विभाग कार्यरत आहे. कार्यकारी अभियंता संवर्गात ३ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली आहेत. सदर संवर्गात एकही पद रिक्त नाही.
(२) जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथसागर (उत्तर) पैठण व जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.०२ परभणी

प्रकल्पाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| एकूण मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|
| १४३४ | ४६० | ९७४ |

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर या प्राधिकरणांतर्गतच्या कार्यकारी अभियंता लातूर पाटबंधारे विभाग क्र.१, लातूर अंतर्गत मांजरा प्रकल्पाच्या व्यावस्थापनासाठी असलेल्या कार्यालयातील पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| एकूण मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|
| १६४ | ५९ | १०५ |

सरळसेवा भरती व पदोन्नतीच्या माध्यमातून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत योजनेचा निधी शिक्षण संस्थांना वितरित करण्याबाबत

**(५) १२१५ (२४-०४-२०२५) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्वच मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून शिक्षण संस्थांना शासनाकडून फीची प्रतिपूर्ती न मिळाल्याने या संस्था आर्थिक संकटात सापडल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुलींच्या व्यावसायिक शिक्षणात खंड पडू नये म्हणून शासनाने सदर संस्थांना फीची प्रतिपूर्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१२-०८-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

तंत्र शिक्षण उपविभागामार्फत, तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राबविण्यात येत असलेली “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” डीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या राबविण्यात येते. डीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक ३१/०५/२०२५ होता.

सन २०२४-२५ साठी रुपये ९९८.०० कोटी इतका अर्थसंकल्पित निधी तसेच पुरवणी मागणीव्दारे रुपये ३७५.०० कोटी व पुनर्विनियोजनाव्दारे रुपये ५.२७५० कोटी असे एकूण रुपये १३७८.२७५० कोटी निधी प्राप्त झाला. सदर पूर्ण निधी खर्च झाला असून, शै. वर्ष २०२४-२५ साठीचे ९२,५२१ मुलींना व १,३२,०१९ मुलांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष सन २०२५-२६ करीता रुपये १६७८.४० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. त्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत आर्थिक तरतूदीमध्ये २१.७७ टक्के वाढ करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) येथील महानगरपालिकेने उभारलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत वापराविना असल्याबाबत

**(६) १३१७ (१७-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात जवळपास २० लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या आरोग्य विभागाकडे शवागार व शवविच्छेदन गृह अस्तित्वात नसल्यामुळे शहरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आरोग्य संस्थांमध्ये शवागार आणि शवविच्छेदनगृहे स्थापन करण्याची मागणी गत १४ वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात शवागारासाठी ३ रुग्णालयाकरीता प्रस्तावित केलेली कार्यवाही संथ गतीने सुरु असून शवविच्छेदन कक्षाकरीता एम.डी. फॉरेन्सिक मेडिसीन डिग्री असलेला वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या नियुक्ती करून शवविच्छेदनगृह सुरु करण्याची मागणी समर्थन संस्थेने मा.उपमुख्यमंत्री, (नगरविकास), प्रधान सचिव नगरविकास, आयुक्त वसई विरार महानगरपालिका, जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई (जि.पालघर) येथील फादरवाडीतील जिल्हा प्रशासनाच्या आरोग्य केंद्राच्या जागेवर वसई-विरार महानगरपालिकेने उभारलेल्या इमारतीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु न झाल्याने मागील दोन वर्षापासून इमारत वापराविना पडून असल्याची बाब दिनांक ०७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोखिवरे, फादरवाडी, सातिवली, वालीव, भोईडापाडा, जानकीपाडा, रेंज ऑफीस, गोलानी नाका, गावराई पाडा (जि.पालघर) येथील निम्म्याहून लोकसंख्या असलेल्या आदिवासींना आरोग्य क्षेत्रात पुर्वीप्रमाणे मोफत आरोग्याच्या सुविधा पुरविण्याबाबत पालिका आयुक्तांकडे आरोग्य केंद्र सुरु करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालिकेच्या आरोग्य इमारतीत आरोग्य केंद्र सुरु करुन आदिवासी नागरिकांना सुविधा पुरविण्याबात तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालयात व आरोग्य केंद्रात शवागार व शवविच्छेदन गृह उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) :** (१) होय, अंशत: खरे आहे,

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विराटनगर, स्मशानभूमी, विरार (प.),प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर,पाचूबंदर, वसई (प.) आणि सोपारा सामान्य रुणालय, नालासोपारा (प.) या ठिकाणी शवागार उपलब्ध आहेत. परंतु, महानगरपालिकेचे शवविच्छेदन गृह उपलब्ध नाहीत. तथापि, जिल्हा परिषद अखत्यारित ग्रामीण रुग्णालय, विरार, प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, सोपारा याठिकाणी शवविच्छेदन केले जाते त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे,

(३) होय, अंशतः खरे आहे,

सदर बहुउद्देशीय इमारतीचे काम दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी पूर्ण झाले असून विद्युत विभागाच्या जनरेटरसाठी चौथरा व शेडचे काम दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

तद्नंतर इमारतीच्या तळ मजल्यावर सद्य:स्थितीत दिनांक २६ जानेवारी, २०२५ पासून आयुष्मान आरोग्य मंदीर कार्यान्वित करण्यात आले आहे.पहिल्या मजल्यावर एचएमपीव्ही व्हायरस आयसोलेशन केंद्र तयार करण्यात आलेले आहे.

(४), (५) व (६) होय, हे खरे आहे,

गोखिवरे, फादरवाडी, सातिवली, वालीव, भोईदापाडा, जानकीपाडा, रेंज ऑफीस, गोलानी नाका, गावराई पाडा येथील नागरिकांसाठी महानगरपालिकेने खालीलप्रमाणे आरोग्य केंद्र सुरु केलेली आहेत.

१) नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, वालीव

२) नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, सातिवली,

३) आयुष्मान आरोग्य मंदीर, बेलीचा पाडा, सातिवली, वसई (पूर्व),

४) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, भोईदापाडा नाका, वसई (पुर्व)

५) आयुष्मान आरोग्य मंदीर, आरोग्यं परमं धनम्, फादरवाडी

वरील सर्व केंद्रामध्ये कार्यक्षेत्रातील सर्व नागरिक तसेच वास्तव्य करणारे आदिवासी लोकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात येतात.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विराटनगर, स्मशानभूमी, विरार (प.), प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर, पाचूबंदर, वसई (प.) आणि सोपारा सामान्य रुग्णालय, नालासोपारा (प.) या ठिकाणी शवागार उपलब्ध आहेत. महानगरपालिकेचे शवविच्छेदन गृह उपलब्ध नाहीत. तथापि, जिल्हा परिषद अखत्यारित ग्रामीण रुग्णालय, विरार, प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, सोपारा या ठिकाणी शवविच्छेदन केले जाते.

तसेच,वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील वैद्यकीय अधिकारी यांना शवविच्छेदन करण्यास प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाबाबत तारखा व गटनिहाय प्रशिक्षण कार्यक्रम अंतिम करण्याकरीता प्रशासनातील एक वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांना नोडल ऑफिसर म्हणून समन्वयाकरीता नियुक्त करून प्रत्यक्ष संपर्क साधण्याबाबत निर्देशित करण्याची ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १३/०५/२०२५ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारी यांचे शवविच्छेदन करण्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, सोपारा सामान्य रुग्णालय, नालासोपारा (प.) आणि श्री.जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार, विरार पूर्व या ठिकाणी आवश्यक त्या परवानग्या घेऊन शवविच्छेदन गृह स्थापन करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## नदीजोड प्रकल्पांतर्गत पश्चिम महाराष्ट्रातील पाणी कोकण व इतर नदी खोऱ्यात वळविण्याबाबत

**(७) १९४३ (१७-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे**

**विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नदीजोड प्रकल्पांमुळे चार लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या वतीने पश्चिम महाराष्ट्रातील पाणी कोकण ते इतर नदी खोऱ्यात वळविण्याबाबतच्या नदीजोड प्रकल्पाबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, या प्रकल्पाचा फायदा राज्यातील बहुतांश जिल्ह्याला होणार असून या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या वतीने नदीजोड प्रकल्पाबाबत दिनांक १७/०१/२०२५ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेमध्ये चर्चा झालेल्या नदीजोड प्रकल्पांमध्ये कोकण खोऱ्यातील पश्चिमेकडे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी वळण पध्दतीद्वारे पूर्वेकडील अवर्षणग्रस्त भागास वळविण्यासाठीच्या वळण योजनांचा समावेश होता.

या वळण योजनांना शासनाची मार्च २०२० मध्ये तत्वत: मान्यता प्राप्त झाली असून या योजनांसाठी सर्वेक्षण व अन्वेषण करण्यास नोव्हेंबर, २०२० मध्ये मान्यता प्राप्त झाली आहे.

यासाठी भौगोलीक परिस्थितिचा अभ्यास करुन जलअपवर्तन नाली (Catch water drain),वळण बंधारे (Diversion Weir) आणि वळण बोगदे (Diversion Tunnel) बांधण्यासाठी योग्य जागा शोधुन पश्चिमवाहिनी नद्यांमधून अतिरिक्त वाहून जाणारे पाणी पुर्वेकडील कुकडी, इंद्रायणी, मुळा, मुठा व निरा खोऱ्यात प्रवाही पध्दतीने वळविणेबाबत सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून प्राथमिक अन्वेषण अहवाल (PIR) तयार करणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) खाजगी शाळांना मिळणाऱ्या शुल्क प्रतीपूर्तीत वाढ करण्याच्या मागणीबाबत

**(८) २२७६ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ नुसार खाजगी शाळांमध्ये २५ टक्के जागांवर वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जात असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रतिविद्यार्थी १७,६७० रुपये या दरानेच शुल्क प्रतिपूर्ति करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याचे दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या अनेक वर्षांपासून सदरहू रकमेत शासनाकडून कोणतीही वाढ करण्यात न आल्याने वाढत्या महागाईच्या काळात शाळा चालविताना संचालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीतून काय निष्पन्न झाले आहे आणि

वाढत्या महागाईच्या अनुषंगाने ‘आरटीई’अंतर्गत खासगी शाळांना देण्यात येणाऱ्या प्रतिपूर्ति रकमेत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) बालकांचा मोफत व शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ नुसार २५ टक्के अंतर्गत प्रवेश देतांना शाळांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून वंचित व दुर्बल घटकातील बालकांना २५ टक्के जागांवरील शिक्षण देणे अपेक्षित आहे. यामुळे महागाई भत्त्याचा विचार न करता कोविड-१९ नंतर सन २०२२-२३ पासून शैक्षणिक खर्चाच्या प्रतिपूर्तीचा दर रुपये १७,६७०/- इतका निश्चित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) २५१६ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माध्यमिक, उच्च माध्यमिक विभागात मोठ्या संख्येने शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठ्या प्रमाणात शिक्षकांची पदे रिक्त असताना पदभरती न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची होण्याची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे पहिल्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण २१,८३९ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार १८,०३४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. तसेच दूसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे १०,००० शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्राकरिता स्वंतत्र उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक कार्यालय निर्माण करणेबाबत

**(१०) २५६४ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई**

**जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील गोंडवाना विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे अतिदुर्गम व आदिवासी बहूल भागामध्ये विस्तारलेले असल्याने नागपूर येथील सहसंचालक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात गडचिरोलीतील महाविद्यालयांना वेळेवर व कार्यक्षम सेवा मिळण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजासाठी संस्थाचालकांना, प्राध्यापकांना, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वारंवार नागपूरला जावे लागत असल्यामुळे आर्थिक नुकसान व वेळेचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून गडचिरोली येथे गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्रकरीता स्वंतत्र उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक कार्यालय सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०९-२०२५) :** (१), (२) व (३) गडचिरोली येथे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाची निर्मिती करणेबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडुन प्राप्त प्रस्तावावर नियमानुसार कार्यवाही करणेबाबत प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत

**(११) २५८९ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय सध्या ५८ वर्ष असल्याचे माहे मे, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, म्हणून सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० करण्याबाबत शिक्षक संघटनांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्ष करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (१९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) ही शासन स्तरावरील धोरणात्मक बाब आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात समग्र शिक्षण अभियानाअंतर्गत प्राथमिक, माध्यमिक व एकात्मिक विशेष शिक्षकांच्या नियुक्त्या व समायोजनाबाबत

**(१२) २६३३ (१८-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समग्र शिक्षण अभियानाअंतर्गत प्राथमिक, माध्यमिक व एकात्मिक विशेष शिक्षकांच्या नियुक्त्या व २९८४ विशेष शिक्षकांच्या समायोजनाकरीता शासन निर्णय घेणार आहे काय,

(२) असल्यास, वरील शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी शासनाने समिती नेमून किती कालावधीमध्ये ही प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१) (२) व (३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ०८/१०/२०२४ च्या शासन निर्णयान्वये कंत्राटी तत्वावर कार्यरत विशेष शिक्षकांचे नियमित सेवेत समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या केंद्रस्तरावर प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ४८६० पदे राखून ठेवण्यास देखील मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रम, अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) व अपंग एकात्म शिक्षण योजना या योजनांमध्ये कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या एकूण २९८४ विशेष शिक्षकांच्या सेवा त्यांची पात्रता तपासण्याच्या अधिन राहून नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार काही जिल्ह्यांमध्ये समायोजनाची प्रक्रीया पूर्ण झाली असून, उर्वरित जिल्ह्यामध्ये पात्रता तपासून समायोजन लवकरात लवकर करणेत येणार आहे.

---

## शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तके वितरित करण्याबाबत

**(१३) २६३४ (१८-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकार कायदयाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील सुमारे १,४७,००० विद्यार्थ्यांना एकूण ८,८४,३७८ पुस्तके वितरित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक वर्षी या योजनेंतर्गत पुस्तके वितरण करण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये पुस्तके वितरण करण्याचे योग्य नियोजन करुन शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तके वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (०५-०९-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये सन २०२३-२४ च्या यु-डायस पटानुसार प्राप्त ८,७३,४५६ इतक्या पाठ्यपुस्तकांचे वाटप शाळेच्या पहिल्या दिवशी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंशतः अनुदानित प्राथ., माध्य. व उच्च माध्य. शाळांना मंजूर अनुदान टप्पावाढ देण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) २७१७ (१८-०७-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना समान टप्पावाढीचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४ ऑक्टोबर,२०२४ रोजी शासन आदेश काढून ११०४ कोटी रूपये एवढया रक्कमेच्या निधीची तरतूद केली असून अद्यापही सदर निधी प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना समान टप्पावाढीकरीता मंजूर केलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-१०-२०२५) :** (१), (२) व (३) मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १७ जुलै, २०२५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, राज्यातील खाजगी विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांना अनुदानाचा वाढीव टप्पा मंजूर करण्यासंदर्भात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेला दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजीचा शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आला आहे.

दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सध्या टप्पा अनुदान घेत असलेल्या शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा व दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ नंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी विहीत मुल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या तथापि, शासन स्तरावर अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना २० टक्के अनुदानासाठी पात्र करुन अनुदान मंजूर करण्यास तसेच टप्पा अनुदानाकरीता एकूण रुपये ९७०.४२ कोटी इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना " एक राज्य,एक गणवेश " ह्या योजनेच्या अंमबजावणीबाबत

**(१५) २७९१ (१८-०७-२०२५) ॲड.अनिल परब, श्री.संजय केणेकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय शाळेत शिक्षण घेणाऱ्या पहिली ते

आठवीच्या विद्यार्थ्यांना दोन मोफत गणवेश देण्यात येत असून समग्र शिक्षा अभियानांतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणवेशासाठी रुपये ३०० आणि एक जोडी बुट व दोन पायमोज्यांच्या जोडीसाठी रुपये १७० असे अनुदान देण्यात असून बुटांचा जोड आणि दोन पायमोज्यांची जोडी रुपये १७० मध्ये बाजारात उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक विद्यार्थी बुटांअभावी अनवाणीच शाळेत येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथे यासाठी ५० टक्केच निधी उपलब्ध झाला असल्यामुळे येथील ७१ हजार ८०५ विद्यार्थ्यांना एकच गणवेश मिळणार असून स्काऊट गाईडच्या दुसऱ्या गणवेशासाठी विद्यार्थ्यांना प्रतिक्षा करावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात आलेल्या “एक राज्य, एक गणवेश” या योजनेच्या अंमलबजावणीचा निर्णय शासनाने मागे घेतला असून सदर निर्णय मागे घेण्यामागची प्रमुख कारणे काय आहेत, तसेच विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश मिळावे या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत व गणवेश वेळेत मिळण्यात विलंब होण्याची प्रमुख कारणे काय आहेत,

(४) असल्यास, मोफत गणवेश योजनेपासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यासाठी रुपये ७५.६० कोटी व सर्व पात्र विद्यार्थ्यांना बुट व पायमोजे देण्यासाठी रुपये ८२.९२ कोटी इतकी तरतूद शासनाने केली असून सदर योजनेची अंमलबजावणी शालेय व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांना गणवेश आणि बुटांच्या जोडीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (२४-०९-२०२५) :** (१) केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत व राज्य योजनेंतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना दोन मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. तसेच, सदर विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून मोफत बुट व पायमोजे याचा लाभ देण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात सर्व विद्यार्थ्यांना मोफत बुट व पायमोजे यांचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीमार्फत देण्यात आला आहे.

(२) समग्र शिक्षा व राज्य योजनेंतर्गत उपलब्ध निधीनुसार गणवेश पात्र लाभार्थ्यांना गणवेश वितरणासाठी ५० टक्के निधी दिनांक २२ मे, २०२५ रोजी वितरीत करण्यात आला आहे. तसेच, दुसऱ्या टप्प्यातील निधीपैकी रुपये १०५ प्रमाणे निधी वितरीत करण्यात आला असून उर्वरित १९५ प्रमाणे निधी वितरणाची कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत सुरु आहे.

(३) सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये केंद्रीकृत पध्दतीने मोफत गणवेश योजनेचा लाभ देताना आलेल्या अडचणी, उद्भवलेल्या तक्रारी त्यानुषंगाने मा.लोकप्रतिनिधी, शिक्षक संघटना इत्यादींनी मोफत गणवेश योजनेचा लाभ पूर्वीप्रमाणेच विकेंद्रीकरण पध्दतीने देण्यात यावा, अशी मागणी केली होती. सदर मागणीच्या अनुषंगाने मोफत गणवेश योजनेचा लाभ सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून पूर्वी प्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीद्वारे देण्याचा निर्णय दिनांक २० डिसेंबर, २०२४ च्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात

आला आहे.
(४) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी राज्य योजनेतून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यासाठी रुपये ६६.९५ कोटी व मोफत बुट व पायमोजे यांचा लाभ देण्यासाठी रुपये ७३.०५ कोटी निधी अर्थसंकल्पित केला आहे. प्रस्तुत निधीतून शाळा व्यवस्थापन समितीव्दारे विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, बुट व पायमोजे यांचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) केंद्र शासनाने समग्र शिक्षांतर्गत मोफत गणवेश योजनेसाठी रुपये ३००/- प्रति गणवेश या निश्चित केलेल्या दराप्रमाणेच राज्य योजनेतून मोफत गणवेश योजनेचा दर निश्चित केला आहे. केंद्र शासनाने प्रस्तुत दरात वाढ केल्यास राज्य योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या गणवेशाचा दरात वाढ करण्याचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळास सादर करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अन्न सुरक्षा कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(१६) २९०२ (१७-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक रेशनकार्ड धारकांना अन्न सुरक्षा कायदयाअंतर्गत धान्य मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सद्य:स्थितीत एकूण किती रेशनकार्ड धारक आहेत व त्यापैकी किती रेशनकार्ड धारकांना दरमहा धान्य व इतर साहित्य वितरित करण्यात येते, उर्वरित रेशनकार्ड धारकांना अद्याप धान्य वितरित न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अन्न सुरक्षा कायदयाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१९-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२५ मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ (NFSA अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेमध्ये समाविष्ट १.६६ कोटी शिधापत्रिकाधारकांपैकी १.५२ कोटी शिधापत्रिकाधारकांनी म्हणजेच ९१ % शिधापत्रिकाधारकांनी अन्नधान्याचा लाभ घेतला आहे.
(२) सद्य:स्थितीत राज्यात एकूण २.५० कोटी शिधापत्रिकाधारक आहेत. त्यापैकी NFSA अंतर्गत १.६७ कोटी शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. राज्यात सरासरी दरमहा ९०- ९१% शिधापत्रिकाधारक अन्नधान्याचा लाभ घेतात.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शेतकरी शिधापत्रिकाधारकांना विविध सणांनिमित्त प्रत्येकी १ किलो या परिमाणात साखर, चनाडाळ, रवा व १ लिटर या परिमाणात सोयाबीन तेल हे शिधाजिन्नस समाविष्ट असलेला शिधाजिन्नस संच "आनंदाचा शिधा" प्रतिशिधापत्रिका १ शिधाजिन्नस संच ई-पॉस प्रणालीद्वारे रुपये १००/- प्रतिसंच या सवलतीच्या

दराने वितरीत करण्यात येतो. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत धान्याचा लाभ मिळण्याकरीता दिनांक १७/०७/२०१३ व दिनांक १७/१२/२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार पात्रता निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना इष्टांकाच्या मर्यादेत अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो.

(३) केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटूंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन मंजूर केले जाते. सदर नियतनाच्या मर्यादेत राज्यातील जिल्ह्यांना अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांना काटेकोरपणे पडताळणी करुन अन्नधान्याचे वितरण विहित कालमर्यादेत केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समग्र शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणेबाबत

**(१७) २९०७ (१८-०७-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर, श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समग्र शिक्षा अभियानांतर्गत पदांवर कंत्राटी कर्मचारी नियुक्ती करतांना निवडप्रक्रियेचे प्रचलित नियमांचे पालन करून सदर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समग्र शिक्षा अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी समग्र शिक्षा संघर्ष समितीद्वारा दिनांक ०४ मार्च २०२५ पासून आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत आंदोलन केले असून माजी शिक्षक आमदार तथा कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद यांनी दिनांक ११/०३/२०२५ रोजी पत्र पाठवून बेमुदत उपोषणाची दखल घेण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी आणि कर्मचारी संघटनांनी केलेल्या मागणीनुसार मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यासाठी समिती गठीत केली असून सदर समितीने बैठका घेऊन अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे सेवेत प्रविष्ट झालेल्या परंतु कंत्राटी कर्मचारी हा शिक्का लागलेल्या या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून त्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०८-२०२५) :** (१) व (२) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद सेवा नियमावली, १९९४ अन्वये या योजनेसाठी करार पध्दतीने सहा महिन्यांच्या कालखंडानंतर एक दिवसाचा खंड देऊन नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

समग्र शिक्षा योजनेंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात आंदोलनकर्ते कर्मचारी यांचेशी मा.मंत्री, शालेय शिक्षण यांनी केलेल्या चर्चेअंती आंदोलन मागे घेण्यात आले होते.

(३) व (४) समग्र शिक्षा योजनेंतर्गत करार पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निदेशांनुसार शासनास शिफारशी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२/०८/२०२४ अन्वये गठीत करण्यात आलेल्या

समितीचे प्रशासकीय कारणास्तव दिनांक ०४/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुर्नरचना करण्यात आली आहे. त्यानुसार, समितीची पहिली बैठक दिनांक २५/०६/२०२५ रोजी पार पाडली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांच्या भरतीबाबत

**(१८) २९११ (१८-०७-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार खाजगी अनुदानित शाळातील रिक्त जागा भरण्याचा अधिकार संबंधित संस्थांना असूनही सध्या पोर्टलद्वारे सुरू असलेली शिक्षकांच्या रिक्त पदांची भरती करण्याची कार्यवाही सदर अधिनियमास धरून करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,पोर्टलद्वारे शिक्षकांची भरती प्रक्रिया राबविण्यासाठी महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती अधिनियम, १९७७ व नियमावली, १९८१ मध्ये सुधारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोर्टलद्वारे होत असलेली शिक्षक भरती थांबवून शासनाने शिक्षक भरतीचे अधिकार पूर्ववत खाजगी संस्थाकडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) जनहित याचिका क्र. ८/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशान्वये शासन अनुदान देय असणाऱ्या संस्थांतील शिक्षक पदभरतीतील गैरव्यवहार टाळण्यासाठी व शिक्षकांची निवड गुणवत्तेच्या आधारे करून निवड प्रक्रिया पारदर्शी होण्यासाठी राज्य शासनाने उपाययोजना करावी, असे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशास अनुसरुन राज्यातील शिक्षकभरती पवित्र पोर्टल मार्फत करण्यासंदर्भात शासन अधिसूचना दिनांक २२/०६/२०१७ अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळांतील नियम (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये सुधारणा करण्यात आली व याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३/०६/२०१८ निर्गमित करण्यात आला. मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.५०५९/२०१८ प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०१९ अन्वये पात्र उमेदवारांपैकी शिक्षण सेवकांची अंतिम निवड खाजगी शैक्षणिक संस्था मुलाखतीच्या आधारे करील, असे निश्चित करण्यात आले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सहकार कायदयात काळानुरुप बदल सुचविण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याबाबत

**(१९) ३९१२ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकार कायदयात काळानुरुप बदल सुचविण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास पुणे येथे घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचे सदस्य कोण आहेत व समितीची कार्यकक्षा काय आहे,
(३) असल्यास, समितीचा अहवाल किती कालावधीत प्राप्त होणार आहे ?

**श्री.बाबासाहेब पाटील (२२-०९-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये कालानुरुप काय बदल करावेत याबाबत एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात यावी असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १४/७/२०२५ रोजी आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ अंतर्गत विविध उपक्रम राबविण्याबाबतच्या राज्य शिखर समितीच्या बैठकीत दिले आहेत.
(२) शासनाकडून राज्याचे सहकार धोरण निश्चित करणेसाठी शासन निर्णय दिनांक २९/१२/२०२३ अन्वये सहकार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. दिनांक २४/७/२०२५ रोजी केंद्रीय सहकार मंत्रालयाने राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर केले आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेले निर्देश व राष्ट्रीय सहकार धोरणानुसार राज्याचे सहकार धोरण निश्चित करणे व त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कायद्यात बदल करणेसंदर्भात शासन निर्णय दिनांक २९/१२/२०२३ अन्वये गठीत समितीची पुनर्रचना करुन मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करणेसाठीचा प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक १२/८/२०२५ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका हद्दीत पिण्याच्या पाण्यासह तलाव, तरणतलाव, खाडी, नाले प्रदूषित झाल्याबाबत

**(२०) ४१४५ (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका हद्दीत सुमारे ३५ तलावांच्या ठिकाणी दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करण्यात येऊनही पिण्याच्या पाण्यासह, तलाव, तरणतलाव, खाडी, नाले यांचे पाणी प्रदूषित झाल्याचे ठाणे महानगरपालिकेने जाहीर केलेल्या पर्यावरण अहवालात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी विविध प्रकारचे उपाय केले जाऊनही पिण्याचे पाणी पिण्यास अयोग्य असलेल्या पाण्याचे प्रमाण नऊ टक्के तर पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ९१ ते ९२ टक्क्यांपर्यंत आढळून आली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या काही वर्षात खाडीचे पाणी दूषित झाले असून रेतीबंदर, मुंब्रा, कळवा, साकेत, कशेळी, कोलशेत आणि गायमुख खाडीची गुणवत्ता कमी होऊन ऑक्सिजनचे प्रमाण अधिक आढळून आले असून अमोनिकल नायट्रोजनची पातळी वाढल्याचे अहवालात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीत प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेल्या तलाव व खाडी, नाले यांच्या ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) :** (१) खरे नाही.
(२) खरे नाही.

टेमघर जलशुद्धीकरण केंद्र, स्टेम डिस्ट्रीब्युशन ॲण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून घेण्यात येणारे पाण्याचे १००% पाणी नमुने योग्य आहेत. ठामपा शहरात WHO च्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता मानकांनुसार रहावी, यासाठी दररोज रहिवासी संकुले वहन व वितरण व्यवस्थेमध्ये तसेच नळ संयोजनामधून पाणी नमुने घेण्यात येतात व त्यानुसार पिण्यायोग्य पाणी पुरविणेबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येते.
(३) खरे नाही,

ठाणे खाडीमध्ये ठाणे, नवी मुंबई भागातील नाले खाडीत जाऊन मिळतात. ठाणे क्षेत्रामधील खाडीच्या पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांप्रमाणे योग्य आहे.
(४) ठाणे शहरात ३७ तलाव असून सर्व तलावांची पाण्याची गुणवत्ता योग्य राखण्यासाठी नियमितपणे सर्व तलावांच्या ठिकाणी एरियेशन यंत्रणा उभारलेली आहे. तसेच,तलावांना नियमितपणे बायोप्रोडक्टचा डोस देण्यात येतो व सर्व तलावांची गुणवत्ता नियमितपणे तपासण्यात येते. तसेच,ठाणे महानगरपालिकेने ३१८ MLD ची STP यंत्रणा उभारलेली आहे. तसेच १८५ खाजगी संकुलांमध्ये STP यंत्रणा कार्यान्वित आहे. ठामपाच्या STP प्रकल्पातील प्रक्रिया करुन बाहेर सोडण्यात येणाऱ्या पाण्याची गुणवत्ता MPCB मानकांनुसार असल्याची खात्री ठामपाद्वारे करण्यात येते. ठाणे शहरात एकूण ८३ नाले आहेत. काही नाल्यांच्या ठिकाणी खाडीत घनकचरा जाण्यापासून रोखण्याकरीता जाळ्या बसविण्यात आल्या आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीतील खाडी व नाले यांच्या ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याबाबत, अमृत २ योजना, राज्य सरोवर सवंर्धन योजना तसेच STP उभारणीद्वारे महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.